ICE 'n' SPICE
व्हेज रेस्टॉरन्ट
पंजाबी डिशेस् । पावभाजी । चाईनीज । ज्युसेस् । आईस्क्रीम
गोदावरी कॉम्प्लेक्स, व्ही.आय.पी.रोड, नांदेड
मो. 9422172572, 9850430189

सायं दैनिक
# नांदेड वार्ता
www.nandedwarta.com

● वर्ष २४ वे ● अंक २२३ ● मंगळवार दि.२ जून २०२६ ● नांदेड ● पोस्ट परवाना क्र.जी.-२/आरएनपी/एनएनडी-२६२/२०२३-२०२५ ● पाने ४ ● किंमत १ रु.

## शेतकऱ्यांच्या कर्जमाफीवर मंत्रिमंडळाची मोहर;घोषणा मात्र निवडणुकीनंतर

### ५६ लाख शेतकऱ्यांचे २ लाखांचे कर्ज माफ;नियमीत कर्जदारांना ५० हजार अनुदान?




मुंबई/प्रतिनिधी-राज्यातील लाखो शेतकऱ्यांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची आणि दिलासादायक बातमी समोर आली आहे. राज्य मंत्रिमंडळाने मंगळवारी झालेल्या बैठकीत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजनेला मंजुरी दिली आहे. या निर्णयामुळे आर्थिक अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार असला, तरी विधान परिषद निवडणुकीची आचारसंहिता लागू असल्याने या निर्णयाची अधिकृत घोषणा निवडणूक प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरच करण्यात येणार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंत्रिमंडळ बैठकीपूर्वी प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना यासंदर्भातील माहिती दिली. त्यांनी सांगितले की, सरकारने कर्जमाफीच्या निर्णयासंदर्भात निवडणूक आयोगाकडे परवानगी मागितली होती. आयोगाने निर्णय मंजूर करून त्यावरील प्रशासकीय प्रक्रिया सुरू करण्यास परवानगी दिली आहे. मात्र, आचारसंहितेमुळे या निर्णयाची सार्वजनिक घोषणा करण्यास परवानगी नसल्याने सरकारला सध्या अधिकृत माहिती जाहीर करता येणार नाही.राज्य सरकारने यापूर्वीच्या अर्थसंकल्पात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजना जाहीर केली होती. या योजनेअंतर्गत ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत पीककर्ज थकित असलेल्या ५६ लाख पात्र शेतकऱ्यांचे २ लाख रुपयांपर्यंतचे कर्ज माफ करण्यात येणार आहे. तसेच नियमितपणे कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी ५० हजार रुपयांचे विशेष अनुदान देण्याचाही निर्णय सरकारने घेतला आहे.मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले की, मंत्रिमंडळाने आज या प्रस्तावाला मान्यता दिली असून पुढील कार्यवाही सुरू केली जाणार आहे. मात्र, निवडणूक आयोगाच्या निर्बंधांमुळे निर्णयाचा तपशील किंवा अटी-शर्ती सध्या जाहीर करता पान ४ वर

## नांदेड विधानपरिषद निवडणूक: आठही उमेदवारांचे अर्ज वैध



नांदेड/प्रतिनिधी-नांदेड स्थानिक स्वराज्य संस्था मतदार संघाच्या निवडणुकीतील आठ उमेदवारांनी दाखल केलेले अर्ज छाननी प्रक्रियेत वैध ठरले आहेत.

स्थानिक स्वराज्य संस्था मतदार संघाच्या निवडणुकीतील दाखल केलेल्या उमेदवारांच्या अर्जाची छाननी जिल्हाधिकारी तथा पीठासीन अधिकारी राहुल कर्डिले यांच्या उपस्थितीत करण्यात आली. या छाननीत अमरनाथ राजूरकर (भाजप), प्रविण पाटील चिखलीकर (राष्ट्रवादी काँग्रेस), रामदास पाटील सुमठाणकर (काँग्रेस), ज्योतीबा खराटे (शिवसेना उबाठा), माधव पवार जवळगावकर (काँग्रेस), कृष्णा पाटील आष्टीकर (शिवसेना उबाठा) प्रशांत इंगोले (वंचित), पंकज माणिकराव गायकवाड (अपक्ष) या आठ उमेदवारांचे अर्ज वैध ठरले आहेत. उमेदवारी अर्ज दि.४ जून दुपारी ३ वाजेपर्यंत मागे घेता येणार आहेत. त्यानंतरच निवडणुकीचे चित्र स्पष्ट होणार आहे.

## ग्रामसडक योजना टप्पा-३ ला मंत्रिमंडळाची मंजुरी

### १७ हजार कोटींच्या रस्ते सुधारणा प्रकल्पाला मंजुरी




मुंबई/प्रतिनिधी-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज मंगळवारी झालेल्या राज्य मंत्रिमंडळ बैठकीत ग्रामीण रस्ते विकास, उच्च शिक्षण आणि पायाभूत सुविधांशी संबंधित महत्त्वपूर्ण निर्णयांना मंजुरी देण्यात आली. मुख्यमंत्री ग्रामसडक योजना टप्पा-३ अंतर्गत रस्त्यांच्या कामांना गती देण्यासाठी आशियाई इन्फ्रास्ट्रक्चर इन्व्हेस्टमेंट बँकेकडून ५०० दशलक्ष अमेरिकन डॉलर्सचे कर्ज तसेच राज्याच्या निधीला हिरवा कँदील देण्यात आला.

राज्यातील रस्ते सुधारणा आणि विकासाला वेग देण्यासाठी आशियाई पायाभूत गुंतवणूक बँक आणि न्यू डेव्हलपमेंट बँक यांच्याकडून प्रत्येकी ८,७०० कोटी रुपयांचे अर्थसहाय्य मिळणार आहे. त्यामुळे महाराष्ट्र राज्य रस्ते सुधारणा प्रकल्पाची प्रभावी अंमलबजावणी होऊन ग्रामीण व शहरी भागांतील दळणवळण व्यवस्था अधिक सक्षम होणार असल्याचा विश्वास व्यक्त पान ४ वर




नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघातील विविध विकासकामा संदर्भात आ.आनंदराव बोंढारकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेवून निवेदन दिले आहे.

## मुंबई पोलिसांच्या कारवाईत ८० कोटींचे अंमली पदार्थ जप्त

मुंबई/प्रतिनिधी-पुणे, पिंपरी चिंचवडमधील विषारी दारुप्रकरणात २४ जणांचा बळी गेल्याने राज्यात गेल्या काही दिवसांत अवैध धंद्यांविरुद्ध पोलिसांच्या कारवाईला वेग आला आहे. त्यामध्ये, अवैध दारुसह, ड्रग्ज प्रकरणातही पोलिसांकडून धाडी टाकून कारवाई केली जात आहे. त्यातच, गुजरात राज्यामध्ये ड्रग्ज फॅक्टरीवर कारवाई करून तब्बल ८० कोटी रुपयांचे ड्रग्स जप्त केले आहेत. तर, पान ४ वर

## लाडकी बहीण योजनेतील १४ हजार लाडक्या भावांकडून वसूली-मुख्यमंत्री फडणवीस

### ८१ लाख महिला अपात्र मात्र वसूली नाही

मुंबई/प्रतिनिधी-मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेत मोठा गैरप्रकार उघडकीस आला असून तब्बल १४ हजार पुरुषांनी या योजनेचा लाभ घेतल्याचे समोर आले आहे. या पुरुषांकडून योजनेअंतर्गत मिळालेली संपूर्ण रक्कम वसूल केली जाईल, मात्र ८१ लाख अपात्र ठरलेल्या लाडक्या बहिणींकडून वसुली केली जाणार नाही अशी स्पष्ट घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली.

मंत्रिमंडळ बैठकीपूर्वी माध्यमांशी संवाद साधताना फडणवीस यांनी सांगितले की, लाभार्थ्यांची पडताळणी करताना आयकर विभाग, परिवहन विभाग, सरकारी कर्मचारी वेतन पोर्टल तसेच रेशनकार्ड डेटाबेसची छाननी करण्यात आली. या तपासणीत १४ हजार पुरुषांनी महिलांसाठी असलेल्या योजनेचा लाभ घेतल्याचे उघड झाले.मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले की, केवायसी न केलेल्या महिलांना यापुढे लाभ दिला जाणार नाही. मात्र, त्यांच्याकडून पूर्वी मिळालेली रक्कम परत घेतली जाणार नाही. परंतु चुकीची माहिती देऊन अथवा नियमबाह्य पद्धतीने लाभ घेणाऱ्या १४ हजार पुरुषांवर पान ४ वर

## कांदा उत्पादक शेतकऱ्यांना न्याय मिळेपर्यंत संघर्ष करत राहणार:हर्षवर्धन सपकाळ



पुणे-शेतकऱ्यांनी रक्ताचे पाणी करून मोठ्या कष्टाने पिकविलेला कांदा कवडीमोल दराने विकावा लागत आहे. कांद्याला प्रति किलो दोन रुपयेही दर मिळत नाही. केंद्र सरकारच्या चुकीच्या धोरणामुळे कांदा उत्पादक शेतकरी उद्ध्वस्त झाला आहे. कांद्याला तीन हजार रुपये प्रति क्विंटल भाव व शेतक-यांना न्याय मिळवून देण्यासाठी काँग्रेस पक्ष व महाविकास संघर्ष करत राहील असे काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले.

कांद्याला ३ हजार रुपये हमीभाव मिळावा, कमी भावात विकलेल्या कांद्याला इमुदान द्यावे, शेतक-यांचा सर्व कांदा नाफेडमार्फत खरेदी करून शेतकऱ्यांना न्याय द्यावा अशा विविध मागण्यांसाठी आज महाविकास आघाडीने पुण्याच्या आंबेगाव तालुक्यात पुणे नाशिक महामार्गावर रास्ता रोको आंदेलन केले. पोलिसांकडून धरपकड सुरु असतानाही हजारो शेतकरी रस्त्यावर उतरले होते. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे, खा. निलेशजी लंके, आ. बापूसाहेब पठारे, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आ. बाबाजी काळे, माजी आ. अशोकबापू पवार, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पक्षाचे पुणे जिल्हाध्यक्ष देवदत्त निकम यांच्यासह महाविकास आघाडीतील घटक पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मोठ्या संख्येने शेतकरी बांधव उपस्थित होते. यावेळी बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, वाढती महागाई, शेती उत्पादनाचा वाढलेला पान ४ वर

## अधिक मासानिमित्त श्री रेणुका मातेच्या दर्शनासाठी माहूर गडावर भक्तीचा महासागर



माहूर/प्रतिनिधी- अधिक मास, उन्हाळी सलग सुट्ट्या आणि धार्मिक उत्साहाच्या पार्श्वभूमीवर श्री रेणुका माता मंदिर येथे भाविकांचा भक्तीमय महासागर उसळला आहे. मंगळवारी पहाटे पाच वाजल्यापासूनच दर्शनासाठी भाविकांच्या रांगा लागल्या होत्या. सोमवारी मुक्कामी असलेल्या हजारो भाविकांमुळे संपूर्ण मंदिर परिसर पहाटेपासूनच गजबजून गेला होता.

उन्हाळ्याची तीव्रता वाढत असल्याने भाविक सकाळच्या वेळेतच दर्शनासाठी मोठ्या प्रमाणात गर्दी करत आहेत. शाळांना सुट्ट्या लागल्यामुळे राज्यासह परराज्यातूनही कुटुंबासह भाविक माहूर गडावर दाखल होत असून धार्मिक पर्यटनालाही मोठी चालना मिळत आहे.दर तीन वर्षांनी येणारा अधिक मास अर्थात धोंड्याचा महिना हा हिंदू धर्मात अत्यंत पवित्र मानला जातो. या अधिक मासातील अर्धा कालावधी पूर्ण झाला असून अजून एक पंधरवडा शिल्लक आहे. त्यामुळे आगामी दिवसांत भाविकांची संख्या आणखी वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. महाराष्ट्रातील नांदेड जिल्ह्यातील माहूर हे रेणुकामातेचे प्रमुख शक्तीपीठ म्हणून ओळखले जाते. अधिक मासात येथे विशेष पूजा-अर्चा, महायाग, धार्मिक कार्यक्रमाचे, आयोजन करण्यात येत आहे. भाविक भक्तिभावाने माता रेणुकेच्या चरणी नतमस्तक होत कुटुंबातील सुख-समृद्धी, प्रेम, वात्सल्य आणि आरोग्यासाठी प्रार्थना करत आहेत. अधिक मासाला हिंदू धर्मात विशेष महत्त्व असून या काळात जप, तप, दानधर्म, नामस्मरण आणि धार्मिक साधनेला विशेष प्राधान्य दिले जाते. त्यामुळे माहूर गडावर सध्या सर्वत्र भक्तीमय वातावरण निर्माण झाले असून जय रेणुका माताच्या जयघोषाने माहूर गड दुमदुमून गेला आहे.

## नांदेड जिल्ह्यातील पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्या

नांदेड/प्रतिनिधी-पोलीस अधीक्षक अबिनाशकुमार यांनी नांदेड जिल्ह्यातील काही पोलीस अधिकाऱ्यांच्या अंतर्गत बदल्यांचे आदेश जारी करण्यात आले आहेत.

वजिराबाद पोलीस स्टेशनचे पोलीस निरिक्षक परमेश्वर कदम यांची हदगाव पोलीस ठाण्यात बदली करण्यात आली आहे. त्यांच्या जागी वजिराबाद पोलीस ठाण्यात भोकर पोलीस स्टेशनचे पोलीस निरिक्षक अजित कुंभार यांची नियुक्ती करण्यात आली. भोकर पोलीस स्टेशनचा अतिरिक्त पदभार सहाय्यक पोलीस निरिक्षक शैलेंद्र आवटे यांच्याकडे देण्यात आला आहे. पोलीस नियंत्रण कक्षातील पोलीस निरिक्षक मारोती मुंडे यांची बदली शहर वाहतूक शाखेत करण्यात आली आहे. शहर वाहतूक शाखेतील सहाय्यक पोलीस निरिक्षक भागवत नागरगोजे यांची बदली सोनखेड पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. सिंदखेड पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरिक्षक रमेश जाधवर यांची इस्लापूर पोलीस ठाण्यात बदली करण्यात आली. त्यांच्या जागी विमानतळ पोलीस स्टेशन येथील सहाय्यक पोलीस निरिक्षक संतोष जोंधळे यांची बदली करण्यात आली. आणखी काही पोलीस स्टेशनच्या प्रभारी अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत.

# युद्धाच्या झळा सर्वसामान्यांच्या माथी

**युद्ध हा कोणत्याही समस्येचा कायमस्वरूपी उपाय नसतो, हे इतिहासाने वेळोवेळी सिद्ध केले आहे. तरी देखील जगातील महासत्ता आणि प्रादेशिक शक्तींमधील संघर्ष थांबताना दिसत नाहीत. सध्या अमेरिका, इराण आणि मध्यपूर्वेतील इतर घडामोडींमुळे निर्माण झालेल्या तणावपूर्ण वातावरणामुळे संपूर्ण जग चिंतेत आहे. या संघर्षाचा परिणाम केवळ संबंधित देशांपुरता मर्यादित नसून त्याचे पडसाद जगभर उमटत आहेत. विशेष म्हणजे या संघर्षात प्रत्यक्ष सहभाग नसलेल्या देशांतील सर्वसामान्य नागरिकांनाही त्याची मोठी किंमत मोजावी लागत आहे. गेल्या काही आठवड्यांपासून युद्ध विरामाबाबत विविध प्रकारच्या बातम्या समोर येत आहेत. कधी अमेरिका आणि इराण यांच्यातील चर्चेत सकारात्मक प्रगती झाल्याचे वृत्त प्रसारित होते, तर काही तासांतच चर्चा अडचणीत आल्याचे किंवा स्थगित झाल्याचे सांगितले जाते. युद्ध विरामाच्या आशा निर्माण होतात आणि लगेचच त्या मावळतात. त्यामुळे जागतिक स्तरावर अनिश्चिततेचे वातावरण निर्माण झाले आहे. युद्ध कधी थांबणार, याचे स्पष्ट उत्तर कोणाकडेही नाही. परिणामी आर्थिक, सामाजिक आणि राजकीय क्षेत्रांमध्ये अस्थिरता वाढत आहे. मध्यपूर्व हा जगाच्या ऊर्जा पुरवठ्याचा केंद्रबिंदू मानला जातो. जगातील मोठ्या प्रमाणावरील कच्च्या तेलाचा पुरवठा या प्रदेशातून होतो. त्यामुळे या भागात युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाली की त्याचा थेट परिणाम आंतरराष्ट्रीय तेलबाजारावर होतो. सध्या देखील तेच चित्र दिसून येत आहे. तेल पुरवठा विस्कळीत होण्याच्या भीतीमुळे कच्च्या तेलाच्या किंमतीत सातत्याने वाढ होत आहे. त्याचा परिणाम पेट्रोल, डिझेल, एलपीजी आणि इतर इंधनांवर होत असून अनेक देशांमध्ये इंधनदर गगनाला भिडले आहेत. इंधनाच्या वाढत्या किमतींचा परिणाम अर्थ व्यवस्थेच्या प्रत्येक घटकावर होतो. वाहतुकीचा खर्च वाढल्याने जीवनावश्यक वस्तूंच्या किंमती वाढतात. शेतमाल बाजारात पोहोचवण्यासाठी अधिक खर्च येतो. उद्योग धंद्यांचा उत्पादन खर्च वाढतो. सार्वजनिक वाहतूक, मालवाहतूक आणि सेवा क्षेत्रावर अतिरिक्त आर्थिक भार पडतो. परिणामी महागाई वाढते आणि सर्वसामान्य नागरिकांचे जीवन अधिक कठीण बनते. पगार किंवा उत्पन्न स्थिर असताना खर्च मात्र सतत वाढत असल्याने मध्यमवर्गीय आणि गरीब कुटुंबांच्या अडचणी वाढत आहेत. युद्धामुळे केवळ आर्थिक संकट निर्माण होत नाही, तर मानसिक अस्वस्थताही वाढते. जगभरातील गुंतवणूकदार आणि व्यापारी वर्ग सावध भूमिका घेतात. शेअर बाजारात मोठ्या प्रमाणावर चढ-उतार होतात. आंतरराष्ट्रीय व्यापारावर परिणाम होतो. अनेक देशांच्या विकास योजनांवर त्याचा विपरीत परिणाम होतो. आर्थिक वाढीचा वेग मंदावतो. जागतिकीकरणाच्या युगात एका देशातील अस्थिरता दुसऱ्या देशाच्या अर्थ व्यवस्थेलाही हादरा देऊ शकते, हे पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे. युद्धाचा सर्वात दुर्दैवी पैलू म्हणजे मानवी जीविताची होणारी हानी. संघर्षग्रस्त भागांतील हजारो कुटुंबे उद्ध्वस्त होतात. अनेकांना आपली घरे सोडून सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करावे लागते. मुलांचे शिक्षण खंडित होते, आरोग्य सेवा विस्कळीत होते आणि सामान्य जीवन पूर्णपणे बदलून जाते. युद्धामुळे निर्माण होणाऱ्या मानवी संकटाची भरपाई कोणत्याही आर्थिक मदतीने होऊ शकत नाही. म्हणूनच शांतता आणि संवाद यांनाच प्राधान्य देणे आवश्यक आहे.आज जगाला युद्धापेक्षा सहकार्याची अधिक गरज आहे. हवामान बदल, दारिद्र्य, बेरोजगारी आणि आरोग्य विषयक आव्हाने यांसारख्या अनेक गंभीर समस्यांसमोर मानवजात उभी आहे. अशा वेळी युद्धावर अब्जावधी डॉलर्स खर्च करण्याऐवजी ते संसाधन विकास आणि कल्याणासाठी वापरणे अधिक आवश्यक आहे. संघर्ष वाढविण्याऐवजी संवाद, समन्वय आणि मुत्सद्देगिरीच्या माध्यमातून तोडगा काढण्याची जबाबदारी सर्व संबंधित राष्ट्रांनी स्वीकारली पाहिजे. युद्धामुळे कोणाचा विजय होतो आणि कोणाचा पराभव होतो, यावर राजकीय चर्चा होऊ शकते; मात्र सर्वसामान्य नागरिक मात्र प्रत्येक परिस्थितीत नुकसानच सहन करतात. वाढती महागाई, इंधनदर, आर्थिक अस्थिरता आणि असुरक्षिततेची भावना यांचा सर्वाधिक फटका सामान्य माणसालाच बसतो. त्यामुळे जगभरातील जनतेची एकच अपेक्षा आहे की, संघर्षाचा मार्ग सोडून शांततेचा मार्ग स्वीकारला जावा. कारण युद्ध विनाश घडवते, तर शांतता विकासाचा मार्ग खुला करते. मानवतेच्या हितासाठी आणि जागतिक स्थैर्यासाठी युद्धविराम हीच काळाची सर्वात मोठी गरज आहे.**

# स्वतंत्र भारतात मतांची विक्री थांबेपर्यंत विकासाची अपेक्षा व्यर्थ

स्वतंत्र भारताला आता अनेक दशके पूर्ण झाली आहेत. विज्ञान, तंत्रज्ञान, उद्योग, शेती, शिक्षण आणि संरक्षण अशा अनेक क्षेत्रांत आपण मोठी प्रगती केली आहे. जगभरात भारताची ओळख एक उदयोन्मुख महासत्ता म्हणून निर्माण होत आहे. परंतु या सर्व प्रगतीच्या चमकदार चित्रामागे अनेक कटू वास्तव दडलेले आहेत. आज सामान्य नागरिकांच्या मूलभूत समस्या, त्यांचे दुःख, त्यांचे प्रश्न आणि त्यांच्या वेदना यापेक्षा प्रसिद्धी, जाहिरातबाजी, राजकीय स्वार्थ आणि सत्तेचे गणित अधिक महत्त्वाचे झाले आहे, ही वस्तुस्थिती नाकारता येणार नाही.

आज आपण रोज वर्तमानपत्रे वाचतो, दूरचित्रवाहिन्या पाहतो, सामाजिक माध्यमांवरील बातम्या पाहतो. परंतु त्यामध्ये गरिबांच्या वेदनांपेक्षा राजकीय आरोप-प्रत्यारोप, प्रसिद्धीचे स्टंट, जाहिराती आणि कृत्रिम प्रतिमा निर्माण करण्याचे प्रयत्न अधिक दिसतात. लाखो-कोट्यवधी रुपयांच्या जाहिराती देऊन प्रतिष्ठा निर्माण करण्याचा प्रयत्न केला जातो. प्रत्यक्षात समाजासाठी काय काम केले, किती लोकांच्या जीवनात बदल घडवून आणला, किती लोकांना न्याय मिळवून दिला, यापेक्षा प्रतिमा कशी दिसते याला अधिक महत्त्व दिले जाते.

सुगंध लपवून ठेवता येत नाही आणि दुर्गंधही झाकून ठेवता येत नाही. एखादी व्यक्ती कितीही स्वतःची स्तुती करीत असली तरी लोक सर्व काही जाणून असतात. समाजातील सुज्ञ नागरिक सत्य ओळखत असतात. म्हणून स्वस्तुती करण्याची गरज नसते. ज्यांच्याकडे खरे कर्तृत्व असते त्यांची कीर्ती आपोआप पसरते.आज अनेक जेष्ठ नागरिकांना समाजातील बदल पाहून वेदना होतात. त्यांनी आयुष्यभर संघर्ष केला, कुटुंब उभे केले, समाजासाठी योगदान दिले. एक काळ असा होता की त्यांचे मत विचारले जायचे, त्यांचा सन्मान केला जायचा. परंतु आज अनेक ठिकाणी जेष्ठांना दुर्लक्षित केले जाते. त्यांना जुन्या विचारांचे म्हणून हिणवले जाते. त्यांच्या अनुभवाकडे दुर्लक्ष केले जाते. जेव्हा घरातील मोठ्यांची गरज असते तेव्हा त्यांना मान दिला जातो; पण गरज संपली की त्यांच्याकडे दुर्लक्ष केले जाते. काही वेळा वृद्धाश्रम हा त्यांचा अंतिम पर्याय बनतो. ही अत्यंत दुःखद बाब आहे.

एक गोष्ट नेहमी लक्षात ठेवली पाहिजे. माणूस जन्माला येतो तेव्हा त्याचे वजन साधारण तीन किलो असते आणि मृत्यूनंतर त्याची राखही काही किलोच उरते. मग आयुष्यभराचा अहंकार, संपत्ती, सत्ता, प्रसिद्धी आणि गर्व यांचे शेवटी काय होते? काहीही सोबत जात नाही. म्हणून माणसाने अहंकार सोडला पाहिजे. नम्रता स्वीकारली पाहिजे.आज अनेक पालक मुलांना स्वतःची मालमत्ता समजू लागले आहेत. पण मुले ही मालमत्ता नसतात. ती स्वतंत्र व्यक्तिमत्त्वे असतात. त्यांना योग्य संस्कार, चांगले शिक्षण आणि योग्य दिशा देणे हे पालकांचे कर्तव्य असते. परंतु आजच्या स्पर्धात्मक जगात मूल्यांपेक्षा पैसा आणि दिखाऊपणाला अधिक महत्त्व दिले जात आहे.देशातील लोकशाहीसमोर सर्वात मोठे संकट कोणते असेल तर ते म्हणजे मतांची विक्री. जोपर्यंत मत विकले जाते, तोपर्यंत खऱ्या अर्थाने विकास होऊ शकत नाही. निवडणुकीच्या काळात पैसा, दारू, भेटवस्तू किंवा विविध प्रलोभने देऊन मतदारांना प्रभावित करण्याचा प्रयत्न केला जातो. मतदारही काही वेळा क्षणिक फायद्यासाठी आपला मतदानाचा अधिकार विकतो. त्यानंतर पाच वर्षे भ्रष्टाचार, अन्याय आणि अपूर्ण विकास यांची तक्रार करतो. ही परिस्थिती बदलणे आवश्यक आहे.

देशात वर्षभर कुठे ना कुठे निवडणुका सुरूच असतात. निवडणुकांमुळे विकासाच्या प्रश्नांवर चर्चा कमी आणि राजकीय प्रचार अधिक होतो. सत्तेसाठी चाललेली स्पर्धा अनेकदा लोकहितापेक्षा वरचढ ठरते. निवडणूक जिंकणे हेच अंतिम




ध्येय बनते. त्यामुळे समाजातील मूलभूत प्रश्न मागे पडतात.आज व्यसनाधीनता ही देशासमोरील एक गंभीर समस्या बनली आहे. दारू, तंबाखू, गुटखा, अमली पदार्थ आणि विविध प्रकारची व्यसने समाजाला पोखरत आहेत. व्यसनांसाठी पैसा लागतो. त्या पैशासाठी अनेकदा गैरमार्ग स्वीकारले जातात. भ्रष्टाचार, गुन्हेगारी आणि अनैतिक व्यवहार यांना खतपाणी मिळते. त्यामुळे विकासाच्या वाटेवर अडथळे निर्माण होतात.

आपण अनेकदा शपथविधी सोहळ्यांतील भाषणे ऐकतो. जनतेची सेवा करण्याचे, भ्रष्टाचार संपविण्याचे, विकास घडविण्याचे आश्वासन दिले जाते. पण काही काळानंतर त्या आश्वासनांचे काय होते? अनेक ठिकाणी आजही लोकांना शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध नाही. नद्याजोड प्रकल्पांची चर्चा होते; पण अनेक भागात पाण्यासाठी संघर्ष सुरूच आहे. पाण्यावरून राजकारण होते. पाण्यातही भ्रष्टाचार होतो. ही अत्यंत लाजिरवाणी बाब आहे.आज परिस्थिती अशी आहे की पिण्याचे पाणी विकत घ्यावे लागते. नैसर्गिक साधनसंपत्तीवर काहींचे नियंत्रण निर्माण होत आहे. सामान्य नागरिकाला जीवनावश्यक गोष्टींसाठीही संघर्ष करावा लागत आहे. महागाई वाढत आहे. शिक्षण, आरोग्य, निवारा आणि रोजगार या सर्व क्षेत्रांत सामान्य माणसाला अडचणींचा सामना करावा लागत आहे.माध्यमांची भूमिकाही अत्यंत महत्त्वाची आहे. पत्रकारिता ही लोकशाहीचा चौथा स्तंभ मानली जाते. पण काही ठिकाणी जाहिराती, आर्थिक हितसंबंध आणि राजकीय दबाव यामुळे खरी पत्रकारिता बाजूला पडताना दिसते. समाजासाठी चांगले काम करणाऱ्या अनेक व्यक्ती, कार्यकर्ते आणि अधिकारी प्रसिद्धीपासून दूर राहतात. त्यांच्या कार्याला अपेक्षित प्रसिद्धी मिळत नाही. उलट वादग्रस्त आणि गाजावाजा करणाऱ्या घटनांना अधिक महत्त्व दिले जाते.



दत्तोपंत डहाळे
नांदेड.

भ्रष्टाचाराने समाजातील अनेक क्षेत्रे पोखरली आहेत. इतकेच नव्हे तर मृत्यूनंतरच्या विधींमध्येही भ्रष्टाचार शिरल्याच्या तक्रारी ऐकायला मिळतात. दुःखाच्या क्षणीही काही लोक नफा कमावण्याचा प्रयत्न करतात. ही परिस्थिती अत्यंत वेदनादायक आहे. माणुसकी आणि संवेदनशीलता हरवत चालली आहे का, असा प्रश्न पडतो.ग्रामीण भागातील परिस्थितीही चिंताजनक आहे. शिक्षणाचा अभाव, माहितीचा अभाव आणि स्थानिक सत्ताकेंद्रांचे वर्चस्व यामुळे अनेक नागरिक अजूनही स्वतंत्रपणे विचार करू शकत नाहीत. अनेक ठिकाणी गावातील प्रभावशाली व्यक्तींच्या दबावाखाली निर्णय घेतले जातात. लोकशाहीची खरी ताकद म्हणजे जागरूक नागरिक; पण नागरिक जागरूक नसतील तर लोकशाही कमकुवत होते.आजची तरुण पिढी मोठ्या संधींसह मोठ्या आव्हानांसमोर उभी आहे. तंत्रज्ञानामुळे जग जवळ आले आहे. माहिती सहज उपलब्ध झाली आहे. पण त्याचबरोबर भोगवाद, दिखाऊपणा आणि क्षणिक सुखाच्या मागे धावण्याची प्रवृत्ती वाढत आहे. संस्कार, मूल्ये, संयम आणि जबाबदारी या संकल्पना काही प्रमाणात दुर्लक्षित होत आहेत. पूर्वी कुटुंबव्यवस्था मजबूत होती. वडीलधाऱ्यांचा आदर केला जायचा. संस्कृती आणि परंपरांना महत्त्व दिले जायचे. आज आधुनिकतेच्या नावाखाली अनेक चांगल्या गोष्टी मागे पडत आहेत. आधुनिकता स्वीकारावी; पण मूल्ये सोडून नाही. प्रगती आणि संस्कार यांचा समतोल राखणे आवश्यक आहे.निसर्गही आज आपल्याला सतत इशारे देत आहे. कधी पूर, कधी दुष्काळ, कधी उष्णतेच्या लाटा, कधी वादळे हवामानातील बदल गंभीर होत आहेत. निसर्गाच्या नियमांकडे दुर्लक्ष करून विकासाचा मार्ग निवडला तर त्याची किंमत संपूर्ण समाजाला मोजावी लागेल. निसर्गापुढे कोणाचेही चालत नाही. त्यामुळे पर्यावरण संवर्धनाला सर्वोच्च प्राधान्य दिले पाहिजे.देशातील प्रशासन आणि राजकारणाबाबत बोलताना वस्तुनिष्ठ दृष्टिकोन आवश्यक आहे. सर्वच लोक भ्रष्ट आहेत असे म्हणणे चुकीचे ठरेल. अनेक प्रामाणिक मंत्री, अधिकारी, कर्मचारी आणि कार्यकर्ते आजही समाजासाठी प्रामाणिकपणे काम करीत आहेत. त्यांच्यामुळेच व्यवस्था पूर्णपणे कोसळलेली नाही. अशा चांगल्या लोकांचे कौतुक झाले पाहिजे.

भ्रष्टाचाराविरोधात कठोर कारवाई होणे आवश्यक आहे. जोपर्यंत गुन्हेगारांना शिक्षा होत नाही, तोपर्यंत भ्रष्टाचार थांबणार नाही. कायद्याचे राज्य मजबूत झाले पाहिजे. न्यायव्यवस्था सक्षम झाली पाहिजे. प्रशासन पारदर्शक झाले पाहिजे. नागरिकांनीही आपली जबाबदारी ओळखली पाहिजे.माणसाला जगण्यासाठी काय आवश्यक आहे? अन्न, वस्त्र, निवारा, पाणी, आरोग्य आणि शिक्षण. यापलीकडील सर्व गोष्टी दुय्यम आहेत. परंतु आज माणूस गरज आणि हव्यास यामधील फरक विसरत चालला आहे. अधिकाधिक मिळविण्याच्या स्पर्धेत मानसिक शांती हरवत आहे. पैसा आवश्यक आहे; पण पैसा हेच जीवनाचे अंतिम ध्येय असू शकत नाही.आज लोकशाहीची व्याख्या अनेकांना विसरल्यासारखी वाटते. लोकशाही म्हणजे केवळ निवडणुका नाहीत. लोकशाही म्हणजे नागरिकांचा सहभाग, अभिव्यक्ती स्वातंत्र्य, समान संधी, सामाजिक न्याय आणि उत्तरदायी शासन. जर नागरिक भयभीत असतील, प्रश्न विचारण्यास घाबरत असतील, तर लोकशाही कमकुवत होते. आपल्या देशासाठी असंख्य स्वातंत्र्यसैनिकांनी बलिदान दिले. त्यांनी स्वातंत्र्याचे स्वप्न पाहिले. त्या बलिदानांची आठवण ठेवणे आवश्यक आहे. त्यांचा सन्मान करण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे प्रामाणिकपणे देशनिर्माण करणे. भ्रष्टाचारमुक्त, न्याय्य आणि संवेदनशील समाज निर्माण करणे.आजचा संदेश साधा आहे. स्वस्तुती करू नका. अहंकार बाळगू नका. जेष्ठांचा आदर करा. मत विकू नका. चांगल्या लोकांना साथ द्या. भ्रष्टाचाराला विरोध करा. पर्यावरण जपा. संस्कार जपा. माणुसकी जपा.जीवन फार छोटे आहे. किती आले आणि किती गेले, याची यादी इतिहासात हरवून जाते. पण आपण कोणाच्या जीवनात आनंद निर्माण केला, कोणाचे अश्रू पुसले, कोणाला न्याय मिळवून दिला, कोणाला आधार दिला, हे मात्र कायम स्मरणात राहते.

देश, समाज आणि पुढील पिढ्यांसाठी आपण सर्वांनी सजग नागरिक म्हणून काम केले पाहिजे. विकासाचा खरा अर्थ फक्त मोठे रस्ते, इमारती आणि प्रकल्प नाहीत. विकास म्हणजे प्रत्येक नागरिकाच्या जीवनात सन्मान, सुरक्षितता, न्याय आणि आनंद निर्माण होणे.हीच एका जेष्ठ नागरिकाची मनापासूनची तळमळ आहे. देश सुखी व्हावा, समाज जागा व्हावा, माणुसकी टिकून राहावी आणि प्रत्येक नागरिकाने जबाबदारीने वागावे. हीच प्रार्थना.

वंदे मातरम्!

# पडसा नवीन बाह्य वळण रस्त्याच्या कामासाठी नागरिकांचा आत्मदहनाचा इशारा

माहूर/प्रतिनिधी-राष्ट्रीय महामार्ग क्र. १६१-A ते आष्टा-पडसा-पैनगंगा मार्गावरील मौजे पडसा नवीन ता. माहूर येथील प्रस्तावित बाह्य वळण रस्त्याचे काम तातडीने सुरू करण्यात यावे, अन्यथा दि.८ जून २०२६ रोजी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यालयासमोर आत्मदहन आंदोलन करण्यात येईल, असा गंभीर इशारा गावकऱ्यांनी दिला आहे.

गावकऱ्यांच्या वतीने सादर करण्यात आलेल्या निवेदनानुसार, पडसा नवीन गावठाणातून मोठ्या प्रमाणात वाहतूक सुरू असल्यामुळे नागरिकांना जीव धोक्यात घालून रस्त्यावरून ये-जा करावी लागत आहे. विदर्भ आणि मराठवाडा जोडणाऱ्या पैनगंगा नदीवरील पुलामुळे या मार्गावरील वाहतूक वाढली असून दुचाकी, चारचाकी तसेच रेती वाहतूक करणारी अवजड वाहने सतत गावातून धावत आहेत. गावातील महिला, लहान मुले, वयोवृद्ध नागरिक तसेच पाळीव जनावरे यांना सतत अपघाताचा धोका निर्माण झाला आहे. विशेष म्हणजे हा रस्ता जिल्हा परिषद प्राथमिक शाळेजवळून जात असल्याने विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनला आहे. वाहनांच्या कर्कश आवाजामुळे विद्यार्थ्यांच्या अध्ययनावरही विपरीत परिणाम होत असल्याचे नागरिकांनी नमूद केले आहे. सदर बाह्य वळण रस्त्यास शासनाची मंजुरी मिळाल्यानंतर दि.२ मार्च २०२२ रोजी तांत्रिक मान्यता आणि दि. ११ जुलै २०२२ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आला होता. मात्र संबंधित कंत्राटदाराने अद्याप काम सुरू केले नसल्याचा आरोप गावकऱ्यांनी केला आहे. दोन्ही बाजूंचे शेतकरी स्वखुशीने जमीन देण्यास तयार असतानाही प्रशासन जाणीवपूर्वक टाळाटाळ करीत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. या संदर्भात



ग्रामपंचायतमार्फत पाठपुरावा करण्यात आला होता. उपसरपंच बाबाराव पाटील चौधरी यांनी यापूर्वी आमरण उपोषणाचा इशारा दिल्यानंतर अधिकाऱ्यांनी एका महिन्यात काम सुरू करण्याचे लेखी आश्वासन दिले होते. तसेच कार्यकारी अभियंता भोकर यांनाही आत्मदहन आंदोलनाबाबत निवेदन देण्यात आले होते. मात्र आश्वासनानंतरही कोणतीही कार्यवाही न झाल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. आमच्या मागण्यांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात असून प्रशासन एकाधिकारशाही पद्धतीने वागत आहे, असा आरोप नागरिकांनी निवेदनात केला आहे. त्यामुळे दि.८ जून २०२६ रोजी सोमवारला कोणत्याही क्षणी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यालय परिसरात अंगावर पेट्रोल ओतून आत्मदहन करण्यात येईल, असा इशारा देत या प्रकरणाची गंभीर दखल घ्यावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

सायंदैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
**मुख्यसंपादक**-प्रदीप नागापूरकर,भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
**सहसंपादक**-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

# देवस्थान इनाम निर्मूलन कायद्याला तीव्र विरोध;मसुदा तातडीने रद्द करण्याची मागणी

किनवट/प्रतिनिधी-देवस्थानच्या इनामी जमिनी, मालमत्तांसह धार्मिक व्यवस्थानांवर महाराष्ट्र सरकार नियंत्रण करु पहात असून त्या संबंधाने प्रस्तावित महाराष्ट्र देवस्थान इनाम निर्मूलन कायदा २०२६ मधील मसुद्याचा महाराष्ट्र सरकारने तातडीने पुनर्विचार करुन तो पुर्णपणे रद्दबातल करावा, कशी मागणी किनवट तालुक्यातील विश्व हिंदू परिषद, विविध मंदिर विश्वस्त मंडळं, पुजाऱ्यांसह तत्सम समित्यांनी महाराष्ट्र सरकारकडे केलीय. स्थानिक सहाय्यक जिल्हाधिकाऱ्यांमार्फत १ जून रोजी महाराष्ट्र देवस्थान इनाम निर्मूलन प्रारुप अधिनियम संदर्भात हरकती व सूचना या हेडखाली पत्रव्यवहार केला असल्याचे प्रसिद्धीसाठी दिलेल्या पत्रकात नमूद केले आहे.

इनामी नाहीसी करणे, पुजारी, वहिवाटदार, मिरासदारांना दिलासा देणे असा प्रारुप अधिनियमांचा उद्देश नमूद आहे. या अधिनियमातील तरतुदी एकत्रितपणे देवस्थान व मंदिरावर शासनाचे नियंत्रण वाढवतात. जे भारतीय संविधानातील कलम २५-२६ मधील धार्मिक स्वातंत्र्याच्या भावनेला प्रतिकूल आहे म्हणून सरकारने पुनर्विचार प्रारंभीक निवेदनाद्वारे महसूल मंत्र्यांकडे तीव्र आक्षेप नोंदवला आहे. या कायद्यामुळे मंदिरांचे सरकारीकरण



होऊन त्यांची स्वायत्तता धोक्यात येईल, अशी भीती त्यांनी व्यक्त केली आहे. 'ऑबॉलिशन-रिग्रांट' मॉडेलमुळे ऐतिहासिक इनाम जमिनी खुल्या बाजारात येतील. यामुळे देवाचे स्नान, नैवेद्य (अंगभोग) आणि उत्सव, जत्रा (रंगभोग) या शतकानुशतके चालत आलेल्या परंपरा खंडित होतील व सेवाधारी वर्गाचे आर्थिक नुकसान होईल.न्यायालयीन अधिकारांवर गदा: वाद निराकरणाचे दिवाणी न्यायालयांचे अधिकार काढून ते महसूल अधिकाऱ्यांना (जिल्हाधिकारी व आयुक्त) देण्याच्या तरतुदीला कायदेशीर विरोध आहे. देवतेला केवळ 'संस्था' मानल्याने तिचे स्वतंत्र विधिक अस्तित्व संपुष्टात येईल, जे संविधानाच्या कलम २५ व २६ मधील धार्मिक स्वातंत्र्याच्या तत्त्वाशी विसंगत आहे. 'देवराई' जमिनींचे व्यावसायिक क्षेत्रात रूपांतर झाल्यास भू-माफियांना बळ मिळून आध्यात्मिक व पर्यावरणीय समतोल बिघडेल म्हणून प्रस्तावित कायद्याचा मसुदा तातडीने रद्द करावा किंवा त्यात मूलभूत सुधारणा कराव्यात अशी मागणी आहे.वाद निराकरणासाठी दिवाणी न्यायालयांचे अधिकार पूर्ववत करावेत. पारंपरिक सेवाधारी व पुजाऱ्यांचे हक्क सुरक्षित ठेवून थेट सरकारी हस्तक्षेप टाळावा अशी श्री गजानन महाराज संस्थान, दुर्गा मंदिर, विठ्ठलेश्वर मंदिर, विहिंप आणि स्वामी समर्थ केंद्रासह किनवटमधील अनेक प्रमुख मंदिरांच्या प्रतिनिधींनी या आक्षेप मसुद्यावर स्वाक्षऱ्या केल्या आहेत हे विशेष.

## स्वच्छ गाव, सुरक्षित जलवायू मोहिमेत कचरा व्यवस्थापन नियोजनावर भर

नांदेड/प्रतिनिधी- जागतिक पर्यावरण दिनानिमित्त स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) अंतर्गत जिल्ह्यात राबविण्यात येत असलेल्या स्वच्छ गाव, सुरक्षित जलवायू मोहिमेला ग्रामपंचायत स्तरावर चांगला प्रतिसाद मिळत असून मोहिमेच्या तिसऱ्या दिवशी, बुधवार दि. ३ जून रोजी गावांमध्ये मोठ्या प्रमाणात कचरा निर्माण करणाऱ्या घटकांची ओळख पटवून त्यांची यादी तयार करण्याची विशेष मोहीम राबविण्यात येत आहे.

या उपक्रमाच्या माध्यमातून गावांमधील कचरा निर्मितीचे प्रमुख स्रोत निश्चित करून भविष्यातील घनकचरा व्यवस्थापनासाठी आवश्यक नियोजन करण्यात येणार आहे. कचरा संकलन, वर्गीकरण व विल्हेवाट व्यवस्थेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी ही माहिती उपयुक्त ठरणार आहे. मोहिमेअंतर्गत दि.४ जून रोजी स्वच्छता जनजागृती, वृक्षारोपण आणि परिसर स्वच्छता अभियान राबविण्यात येणार आहे. ग्रामीण भागातील दृश्यमान स्वच्छता, सार्वजनिक घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन सुविधांची देखभाल-दुरुस्ती तसेच या कामांमध्ये नागरिकांच्या सक्रिय सहभागाचे महत्त्व याबाबत जनजागृती करण्यात येणार आहे. याच दिवशी एक पेड माँ के नाम या उपक्रमांतर्गत वृक्षारोपण मोहिमेदेखील राबविण्यात येणार आहे.

# निवडणुकीच्या अनुषंगाने दिलेल्या जबाबदाऱ्या पार पाडा-अपर जिल्हाधिकारी

नांदेड/प्रतिनिधी-महाराष्ट्र विधान परिषदेच्या नांदेड स्थानिक प्राधिकार मतदारसंघाची द्वैवार्षिक निवडणूक प्रक्रिया पारदर्शक आणि शांततेत पार पाडण्यासाठी सर्व नोडल अधिकारी व सहाय्यक अधिकारी यांनी दिलेली कामे व जबाबदाऱ्या पार पाडण्याच्या अनुषंगाने कार्यवाही करावी, असे निर्देश अपर जिल्हाधिकारी रत्नदीप गायकवाड यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील बैठक कक्षात आज सर्व विभाग प्रमुखांची बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी उपजिल्हाधिकारी (सामान्य) अजय शिंदे, उपजिल्हाधिकारी (निवडणूक) राजकुमार माने, निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर, उपजिल्हाधिकारी (रोहयो) हनुमंत कोळेकर, उपविभागीय अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. यावेळी निवडणूकीच्या अनुषंगाने दिलेल्या जबाबदाऱ्या व कामे सर्व नोडल अधिकारी व सहाय्यक अधिकारी यांनी चोखपणे पार पाडाव्यात या अनुषंगाने निवासी उपजिल्हाधिकारी तथा सहा. निवडणूक निर्णय अधिकारी किरण अंबेकर यांनी सूचना दिल्या. निवडणूकीच्या अनुषंगाने एफएसटी पथके व्हिडीओ कॅमेरासह स्थापन करावेत. जिल्ह्यात आचारसंहितेचा भंग होणार नाही याची दक्षता सर्व विभाग प्रमुखांनी घ्यावी असेही त्यांनी यावेळी सांगितले. यावेळी मतदान व मतमोजणीच्या अनुषंगाने करण्यात येणारे नियोजनासह विविध अनुषंगिक बाबीवर चर्चा करण्यात आली.

# कुणाल आडेची भारतीय सैन्यदलात 'अग्निवीर' म्हणून निवड

मांडवी/प्रतिनिधी-घरची परिस्थिती अत्यंत प्रतिकूल, पण मनात देशाच्या सेवेचे असलेले स्वप्न आणि ते पूर्ण करण्याची जिद्द असेल तर कोणतीही अडचण ध्येयाचा मार्ग रोखू शकत नाही, हे रामजी नाईक तांडा येथील कुणाल सुभाष आडे याने सिद्ध करून दाखवले आहे. सर्व आव्हानांवर यशस्वी मात करत कुणालची भारतीय सैन्यदलात 'अग्निवीर' म्हणून दिमाखात निवड झाली आहे.



प्रतिकूल परिस्थितीशी दोन हात करत जिद्द, चिकाटी आणि कठोर परिश्रमाच्या जोरावर घेतलेल्या या झेपमुळे संपूर्ण परिसरात अभिमानाचे वातावरण आहे.कुणाला शालेय जीवनापासूनच त्याला देशसेवेची प्रचंड ओढ होती. हीच ओढ आणि लष्कर भरतीचे स्वप्न त्याला पूर्ण करण्यासाठी सैनिकी शाळेमध्ये प्रवेश घेऊन त्याने सैन्यात भरती होण्यासाठी आवश्यक असणारे कडेकोट शिक्षण आणि शारीरिक प्रशिक्षण अत्यंत कष्टाने पूर्ण केले.सैनिकी शाळेतील खडतर प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर कुणालने भारतीय सैन्यदलाच्या 'अग्निवीर' भरतीसाठी प्रयत्न केला होता. अत्यंत कठीण समजल्या जाणाऱ्या शारीरिक वैद्यकीय आणि लेखी अशा सर्वच टप्प्यांवरील परीक्षांमध्ये त्याने आपल्या कौशल्याच्या आणि अहोरात्र घेतलेल्या मेहनतीच्या जोरावर नेत्रदीपक यश मिळवले. सर्व निकषांमध्ये अव्वल ठरल्याने अखेर त्याची अंतिम निवड जाहीर करण्यात आली. त्याच्या या यशाबद्दल त्याचे आजोबा उद्धव आडे, वडील सुभाष आडे, आई निरूबाई आडे यांचे कौतुक होत आहे.तर माजी जिल्हा परिषद सदस्य मधुकर बाबाराव राठोड, छगन नाईक जरूर, चंदन मांडण,जयवंत कांबळे, सरपंच उत्तम मेश्राम, पलू नाईक यांच्यासह परिसरातील नाईक कारभारी आणि ग्रामस्थ कुणालची सोशल मीडियाच्या माध्यमातून त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव केला आहे.

# 'वंचित'मध्ये अनेक कार्यकर्त्यांचा प्रवेश

धर्माबाद/प्रतिनिधी-धर्माबाद येथील आर्य भवन येथे दि. १ जून रोजी वंचित बहुजन आघाडी धर्माबादच्या वतीने संवाद आयोजित करण्यात आली होती. जिल्हाध्यक्ष शंकर पाटील महाजन यांच्या उपस्थितीत धर्माबाद तालुक्यातील असंख्य कार्यकर्त्यांनी वंचित बहुजन आघाडीत जाहीर प्रवेश केला आहे.



यावेळी वंचित बहुजन आघाडीचे आकाश बनसोड, अरूण भद्रे, संदेश गायकवाड, प्रकाश कोल्हे, जे. के. जोंधळे, एकनाथ जिंकले, गोतम देवके, चांदोबा वाघमारे, कपिल वाघमारे, रोहित रमटक्के, कैलाश डुमने, सुभाष कांबळे उपस्थित होते. मौजे माष्टी येथील संपुर्ण बौध्द बांधवानी जाहीर प्रवेश केला. सर्व कार्यकर्त्यांचे पदाधिकाऱ्यांनी स्वागत केले आहे.

# जुगाराच्या वादातून निवघा येथे युवकाची चाकूने भोसकून हत्या

हदगाव/प्रतिनिधी-हदगांव निवघा येथे जुगाराच्या डावावरून झालेल्या किरकोळ वादाचे रूपांतर रक्तरंजित हाणामारीत होऊन एका २४ वर्षीय तरुणाची चाकू भोसकून निर्घृण हत्या करण्यात आल्याची धक्कादायक घटना घडली आहे. विजय नारायण कदम (वय २४, रा. निवघा) असे मृत युवकाचे नाव असून, या प्रकरणी हदगाव पोलिसांनी तत्पर कारवाई करत दोन आरोपींना अटक केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, रविवार दि.३१ मे रोजी रात्री साडेआठच्या सुमारास निवघा येथील नवी आबादी अण्णाभाऊ साठे चौक परिसरात काही युवक पत्त्यांचा जुगार खेळत होते. यावेळी विजय कदम याच्याजवळील रोख रक्कम संपल्याने त्याने सोबतच्या व्यक्तींना मी ऑनलाइन पैसे पाठवतो, तुम्ही मला रोख रक्कम द्या अशी विनंती केली. मात्र, याच आर्थिक व्यवहारावरून उपस्थितांमध्ये शाब्दिक वाद सुरू झाला. क्षणात वादाचे रूपांतर हाणामारीत झाले. आरोपी अब्दुल शेख मुजीब, शाहिद पठाण, तब्बू शेख (रा. उमरखेड जि यवतमाळ) तसेच त्यांच्या एका साथीदाराने विजय कदम याला मारहाण करण्यास सुरुवात केली. दरम्यान, आरोपी शाहिद पठाण याने जवळील धारदार चाकू काढून विजयवर सपासप वार केले. पोटावर व शरीराच्या महत्त्वाच्या अवयवांवर वार झाल्याने विजय गंभीर जखमी होऊन रक्ताच्या थारोळ्यात कोसळला. रुग्णालयात पोहोचण्यापूर्वीच मृत्यू घटनेनंतर स्थानिक नागरिकांनी जखमी विजयला तातडीने उपचारासाठी हदगाव उपजिल्हा रुग्णालयात हलविले. मात्र, उपचारासाठी नेत असतानाच वाटेत त्याचा मृत्यू झाला. वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणीअंती त्याला मृत घोषित केले. घटनेची माहिती मिळताच हदगाव पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत तपासाची सूत्रे हाती घेतली. पळून जाण्याच्या तयारीत असलेल्या दोन आरोपींना पोलिसांनी ताब्यात घेतले असून इतर आरोपींचा शोध सुरू आहे. या प्रकरणी भारतीय न्याय संहिता (बीएनएस) कलम १०३ (३) (११८ (२) ३५२ ३ (५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस अधिकारी दिगंबर पाटील करीत आहेत.

## खंजर बाळगणाऱ्या तरुणास अटक

नांदेड/प्रतिनिधी-खंजर जवळ घेवून फिरणाऱ्या एका तरुणास वजिराबाद पोलीसांनी सोमवारी हिंगोली गेट ओव्हर ब्रीज खाली अटक केली आहे.

नागसेन पांडूरंग इंगळे (वय ३३) रा.आंबानगर,सांगवी हा तरुण एखादा गंभीर गुन्हा करण्याच्या उद्देशाने हिंगोली गेट ओव्हरब्रीज खाली संशयास्पदरित्या फिरत असतांना सोमवारी रात्री वजिराबाद पोलीसांच्या एका पथकाने अटक केली. त्याच्या जवळून एक खंजर पोलीसांनी जप्त केले आहे.

# पोलीस दलातील सेवानिवृत्त १४ कर्मचाऱ्यांना निरोप

नांदेड/प्रतिनिधी-पोलीस दलातील ३० मे रोजी सेवानिवृत्त झालेल्या एक उपविभागीय अधिकारी, चार पोलीस उपनिरीक्षक, तीन ग्रेड उपनिरीक्षक, पाच पोलीस अंमलदार व वरिष्ठ श्रेणी लिपिक अशा १४ जणांना पोलीस अधीक्षक अबिनाशकुमार यांच्या हस्ते सपत्नीक सत्कार करुन निरोप देण्यात आला.

याप्रसंगी अपर पोलीस अधीक्षक (भोकर) अर्चना पाटील, सुरज गुरव, नांदेड, पोलीस उपअधीक्षक कंधार डॉ.अश्विनी जगताप, पोलीस कल्याण विभागाचे पोलीस निरीक्षक जगदीश भंडरवार, अच्युत मोरे, हणमंत पोतदार, मारुती कांबळे, नरेंद्र राठोड, सविता भिमलवाड आदी अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. सेवानिवृत्तांमध्ये साहेबराव लक्ष्मण गुट्टे, बाबा नागोराव गजभारे, प्रल्हाद संभाजी हैबतकर, बाबू मैसाजी शिंदे, सुदाम आमरु आडे, हनुमान कानोजी मेश्राम, परमेश्वर जळबा कदम, जगदीश मल्हारराव कुलकर्णी, देविदास सोनबाजी बसवंते, रानबा मारुतराव फड, कैलास किशनराव झडते, दर्शन शिशुपाल यादव, तानाजी माधवराव बिराजदार, आनंदा देवराव बैनवाड आदींचा समावेश आहे.

# संगमवाडीतील पाच सुपुत्रांची भारतीय सैन्य दलात भरारी

कंधार/प्रतिनिधी-कंधार तालुक्यातील संगमवाडी येथील पाच तरुण बांधवांची भारतीय सैन्य दलात निवड झाल्याबद्दल गावात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. देशसेवेची परंपरा कायम राखत भारतीय सैन्यात दाखल झालेल्या या पाचही वीरपुत्रांचा गावकऱ्यांच्या वतीने जाहीर नागरी सत्कार करण्यात आला आणि त्यांच्या पुढील उज्ज्वल भविष्यासाठी व कार्यास शुभेच्छा देण्यात आल्या.

सैन्य दलात निवड झालेल्यांमध्ये अग्निवीर पवन परमेश्वर घुगे, लखन परमेश्वर घुगे, ऋषिकेश मारुती घुगे, शिवदास मारुती तिडके आणि कृष्णा बाबुराव घुगे यांचा समावेश आहे. गावातील या तरुणांनी मिळवलेल्या घवघवीत यशामुळे संगमवाडीचे नाव जिल्हाभरात उंचावले असून, उपस्थित मान्यवरांच्या हस्ते या सर्वांचा शाल, श्रीफळ आणि पुष्पहार घालून सन्मान करण्यात आला. या गौरव सोहळ्याप्रसंगी गावचे सरपंच चक्रधर घुगे, गजानन चव्हाण, सशस्त्र सीमा बलाचे (एसएसबी) पी. एस. आय. केंद्रे, माजी सरपंच नामदेवराव केंद्रे, माजी सरपंच माधवराव घुगे, तसेच माजी सरपंच दगडोबा घुगे प्रामुख्याने उपस्थित होते. याशिवाय ग्रामपंचायतचे सर्व सन्माननीय सदस्य, सेवा सहकारी सोसायटीचे पदाधिकारी व सदस्य, गावातील ज्येष्ठ मंडळी, माता-भगिनी तसेच तरुण बांधव या सोहळ्याला मोठ्या संख्येने उपस्थित होते. हा सत्कार सोहळा अत्यंत उत्साहात पार पडला असून, संपूर्ण गावातून या पाचही सैनिकांवर कौतुकाचा वर्षाव होत आहे.


जा.क्र.मनपा/क्षे.का.३/नावपरि/१६६७/२५-२६
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड.
दिनांक : २४/०२/२०२६

## जाहीर प्रगटन

**संचिका क्रं.२७१/क्षे.का.क्र.०३/४०/२०२५-२६**
**प्रकरण : नांव परिवर्तन करणे बाबत.**

या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, **दिपाली संभाजी पुंडगे, राजकुमार किशनराव कांबळे** रा.**श्रीनगर,**नांदेड यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, **सर्व्हे नं.१३ पैकी सि.स.नं.१४२ पैकी** गाव नमुना सात **प्लॉट नं.१४२ पैकी** ज्याचा महानगरपालिका **मालमत्ता क्र.१-९-६२४ (पीन नं.४०१०१०९४३६) सौ.सुनंदा जंबु चावरे** यांच्या नांवे असलेली मालमत्ता यांचेकडून अर्जदाराने **विक्रीखत नं.१८५४ दि.१८.०२.२०२५** आधारे विकत घेतली आहे./वारसा हक्काने प्राप्त झालेली आहे. तरी त्यांचे नांवे कर आकारणी नोंदवहीत घेण्यात येत आहे.

तरी या संबंधात काही आक्षेप असल्यास त्यांनी हे पत्रक प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून (१५) दिवसाच्या आत या कार्यालयात आपला लेखी आक्षेप पुराव्यासहीत दाखल करावा. नसता वरील अवधी संपल्यानंतर अर्जदाराच्या नावाने वरील प्रमाणे मालमत्ता नोंद घेण्यात येईल.

**चर्तुःसिमाः- पुर्वेस**- श्री.के.टी.लोणे यांचा प्लॉट आहे, **पश्चिमेस-** शंकर ड्रायव्हरचा प्लॉट आहे, **दक्षिणेस-** २५ फुट रुंद आहे, **उत्तरेस-**पासदगावकर जाधव यांचा प्लॉट आहे.

स्वाक्षरित/-
**सहा.आयुक्त**
क्षेत्रीय कार्यालय क्र.०३, शिवाजीनगर
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड

जा.क्र.मनपा/क्षे.का.३/नावपरि/१६५१/२५-२६
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड.
दिनांक : २०/०२/२०२६

## जाहीर प्रगटन

**संचिका क्रं.२६३/क्षे.का.क्र.०३/४०/२०२५-२६**
**प्रकरण : नांव परिवर्तन करणे बाबत.**

या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, श्री.**अभिजीत बलभीमराव रेणापुरकर** रा.**औ.वसाहत,** नांदेड यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, **सर्व्हे नं.५५ ते ६० पैकी सि.स.नं.५९८७ पैकी** गाव नमुना सात **दुकान नं.एस.एफ.२२ पैकी** ज्याचा महानगरपालिका **मालमत्ता क्र.१-२५-१२६ (पीन नं.४०२०१००१०३) व्यवस्थापक नांदेड को.ऑप इंडस्ट्रीयल इस्टेट** यांच्या नांवे असलेली मालमत्ता यांचेकडून अर्जदाराने **सबलीज डीड नं.९१८७ दि.२७.१२.२०२४** आधारे विकत घेतली आहे./वारसा हक्काने प्राप्त झालेली आहे. तरी त्यांचे नांवे कर आकारणी नोंदवहीत घेण्यात येत आहे.

तरी या संबंधात काही आक्षेप असल्यास त्यांनी हे पत्रक प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून (१५) दिवसाच्या आत या कार्यालयात आपला लेखी आक्षेप पुराव्यासहीत दाखल करावा. नसता वरील अवधी संपल्यानंतर अर्जदाराच्या नावाने वरील प्रमाणे मालमत्ता नोंद घेण्यात येईल.

**चर्तुःसिमाः- पुर्वेस**- औद्योगिक वसाहतीचा अंतर्गत रस्ता आहे, **पश्चिमेस-** शिवाजीनगर ते आयटीआय मुख्य रस्ता आहे, **दक्षिणेस-** महानगरपालिका दवाखाना, **उत्तरेस-**स्टेट बँक ऑफ इंडिया व प्लॉट क्र.जे १० चा उर्वरीत भाग.

स्वाक्षरित/-
**सहा.आयुक्त**
क्षेत्रीय कार्यालय क्र.०३, शिवाजीनगर
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड

जा.क्र.मनपा/क्षे.का.३/नावपरि/२१/२५-२६
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड.
दिनांक : १६/०४/२०२६

## जाहीर प्रगटन

**संचिका क्रं.३०७/क्षे.का.क्र.०३/४०/२०२५-२६**
**प्रकरण : नांव परिवर्तन करणे बाबत.**

या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, **नसरीन बेगम मिर्झा महेबुब बेग** रा.**लालवाडी,** नांदेड यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, **सर्व्हे नं.५६ पैकी सि.स.नं.३७२४** गाव नमुना सात **प्लॉट क्र.०९** ज्याचा महानगरपालिका **मा.क्र.१-१-२८५ (पीन नं.४०१०१०१४११) शेख कलीम पि.हाजी शेख अहेमद** यांच्या नांवे असलेली मालमत्ता यांचेकडून अर्जदाराने **विक्रीखत नं.१४९१ दि.१३.०३.२०१९** आधारे विकत घेतली आहे./वारसा हक्काने प्राप्त झालेली आहे. तरी त्यांचे नांवे कर आकारणी नोंदवहीत घेण्यात येत आहे.

तरी या संबंधात काही आक्षेप असल्यास त्यांनी हे पत्रक प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून (१५) दिवसाच्या आत या कार्यालयात आपला लेखी आक्षेप पुराव्यासहीत दाखल करावा. नसता वरील अवधी संपल्यानंतर अर्जदाराच्या नावाने वरील प्रमाणे मालमत्ता नोंद घेण्यात येईल.

**चर्तुःसिमाः- पुर्वेस**- लालवाडी आहे, **पश्चिमेस-** ३.०० मी. रुंद रोड आहे, **दक्षिणेस-** प्लॉट नं.०८ आहे, **उत्तरेस-**मिर्झा फारुक शमशोद्दीन यांचे घर आहे.

स्वाक्षरित/-
**सहा.आयुक्त**
क्षेत्रीय कार्यालय क्र.०३, शिवाजीनगर
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड

## टी.सी.हरवली आहे

माझी सुनील केशव फुलवळे रा.श्रीगणवाडी ता.कंधार जि.नांदेड या नावाची १० वीची टी.सी. व मार्कमेमो आणि इतर महत्वाची कागदपत्रे कंधार ते नांदेड बस प्रवासात हरवली आहेत. कोणास सापडल्यास खालील पत्यावर संपर्क साधावा.

संपर्क पत्ता - **सुनील केशव फुलवळे**
रा.श्रीगणवाडी ता.कंधार जि.नांदेड.पीन नं.-४३१७४२
मो.नं.७३८७९०८७७३

# ज्वारी-मका खरेदीला खीळ:तीन दिवसांत खरेदी बंद;८५० शेतकरी प्रतीक्षेत

## ३० जूनपूर्वी शेतकऱ्यांचे धान्य खरेदी करा;भाजपा किसान मोर्चाचा प्रशासनाला इशारा

किनवट/प्रतिनिधी-किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेचा इस्लापूर येथे शुभारंभ करण्यात आला असून तीन दिवसांत २६ शेतकऱ्यांची ९७९ क्विंटल ज्वारी आणि २० शेतकऱ्यांची १,१०८ मका खरेदी करण्यात आली. कांहींनी व्यत्यय आणल्यामुळे खरेदी बंद करण्यात आली. ऑनलाईन नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांच्या क्रमवारीची यादी तयार करण्यात आली होती त्यानुसारच शेतकऱ्यांना निरोप पाठवून खरेदी प्रक्रिया सुरू ठेवावी. ३० जून पर्यंत उर्वरित ८०४ शेतकऱ्यांच्या धान्याची खरेदी पुर्ण करण्यासाठी आदिवासी विकास महामंडळाच्या उपप्रादेशिक व्यवस्थापकांना युद्धपातळीवर काम करावे लागेल. एकही शेतकरी धान्य विक्रीपासून वंचित राहाणार नाही यासाठी भाजपा किसान मोर्चा नांदेड जिल्हा उत्तरचे जिल्हा चिटणीस उद्धवराव मुंडे पाटील यांनी तहसीलदारांना निवेदन दिले आहे.

किनवट तालुक्यातील ८५० ज्वारी व मका उत्पादक शेतकऱ्यांनी ऑनलाईन नोंदणी केली आहे. १ मे पासून भरडधान्य सुरू करण्याचे उपप्रादेशिक व्यवस्थापकांनी जाहीर केले होते परंतु प्रत्यक्ष खरेदीला २२ मे पासून सुरुवात झाली. केवळ तीन दिवसच खरेदी करण्यात आल्यानंतर व्यापाऱ्यांच्या नावाची सबब पुढे करून चक्क खरेदीलाच टाच लावल्यामुळे वेळ वाया जात असल्याच्या शेतकऱ्यांच्या तक्रारी आहेत. खरेदीचा कालावधी निश्चित केल्यानुसार नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांचे भरडधान्य खरेदी करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा लागेल. एकही शेतकरी धान्य विक्रीपासून वंचित राहाणार नाही यासाठी प्रशासनाने दखल घ्यावी लागेल आणि भाजपा किसान मोर्चा सुद्धा त्यासाठी सक्षम असल्याचे सांगण्यात आले. मुळात १३ एप्रिलपासूनच ज्वारी आणि मका उत्पादक शेतकऱ्यांच्या ऑनलाईन नोंदणीला उघडपणे सुरुवात झाल्याचे सांगितले गेले असले तरी प्रत्यक्षात मात्र तत्पूर्वीच ट्रायलबेसची सबब दाखवून सुरुवात झालेली होती त्यामुळे यादीचे तारतम्य लागलेले नाही. शेतकऱ्यांचा विश्वासघात कोणी करीत असेल तर संयुक्तीक वाटत नाही. आम्ही आंदोलन करणार नसून शेतकरी आणि प्रशासन यांच्यातील महत्त्वाचा दुवा म्हणून काम करणार असल्याचे उद्धवराव मुंडे पाटीलांनी बोलतांना सांगितले. इस्लापूर येथे चालू असलेली खरेदी प्रक्रिया व्यवस्थित चालू असताना व्यापाऱ्यांच्या नावाचा गैरसमज पसरवून खरेदी प्रक्रिया बाधित करण्याचा प्रयत्न केला जात आहे तो, प्रशासनाने तात्काळ हस्तक्षेप करून थांबवावा, कारण शेतकऱ्यांची संख्या आणि विहीत मुदत लक्षात घेता संपूर्ण शेतकऱ्यांचे धान्य खरेदी झाले पाहिजे. मुद्दत संपल्यानंतर पुन्हा खरेदीच्या मुद्दतवाढीसाठी चपला झिजवाव्या लागतील असेही मुंडे म्हणाले. सहाय्यक जिल्हाधिकारी साहेब, तहसीलदार साहेब आणि आदिवासी विकास महामंडळाच्या उपप्रादेशिक व्यवस्थापकांनी आपापल्या स्तरावर तात्काळ निर्णय घेऊन विहीत मुदतीत ऑनलाईन नोंदणी केलेल्या संपूर्ण शेतकऱ्यांचे धान्य खरेदी करावे. व्यापाऱ्यांच्या धान्याची मुळीच खरेदी करु नये. दररोज किमान ३५ ते ४० शेतकऱ्यांच्या धान्याचा तोल करावा लागणार आहे. वेळेचा अपव्यय टाळून युद्धपातळीवर खरेदी चालू करावी यासाठी भाजपा किसान मोर्चा नांदेड उत्तरचे जिल्हा चिटणीस उद्धवराव मुंडे आणि किनवट तालुकाध्यक्ष जगदीश तिरमनवारांनी पत्रव्यवहार केला असल्याचे सांगितले.

## काँग्रेसमध्ये प्रदेशाध्यक्ष हटाव मोहीम

मुंबई/प्रतिनिधी-महाराष्ट्र काँग्रेसमध्ये प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या कार्यपद्धती विरोधातील नाराजी आता उघडपणे समोर येऊ लागली असून, पक्षातील नाराज गटाने थेट दिल्ली दरबारी दाद मागण्याचा निर्णय घेतला आहे. येत्या ८ जून रोजी पक्षाचे काही आमदार आणि ज्येष्ठ पदाधिकाऱ्यांचे शिष्टमंडळ दिल्लीत पक्ष नेतृत्वाची भेट घेणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. या शिष्टमंडळात ४ ते ५ आमदारांसह अनेक ज्येष्ठ नेते व पदाधिकारी सहभागी होणार आहेत. हे शिष्टमंडळ काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, खा.राहुल गांधी तसेच सरचिटणीस के.सी.वेणुगोपाल यांची भेट घेऊन माहिती देणार आहेत.

## प्राचार्यपदी प्रो.डॉ. कुलकर्णी यांची नियुक्ती

नांदेड/प्रतिनिधी-अभिनव भारत शिक्षण संस्था संचलित नेताजी सुभाषचंद्र बोस महाविद्यालय पूर्णवेळ प्राचार्यपदी प्रो. डॉ. महेंद्रकुमार कुलकर्णी यांची नियुक्ती करण्यात आली असून त्यांनी आज प्राचार्यपदाचा अधिकृत पदभार स्वीकारला. अभिनव भारत शिक्षण संस्थेचे कोषाध्यक्ष कैलासचंद काला आणि सहसचिव धनंजय जोशी यांच्या प्रमुख उपस्थितीत हा पदभार स्वीकार समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. यावेळी प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बातमी झळकताच मोडक्या-तोडक्या अस्वच्छ जार गायब;पाण्याच्या गुणवत्तेचा प्रश्न मात्र कायम!

माहूर/प्रतिनिधी-दि.१ जून रोजी नांदेड वार्तामध्ये थंडगार पाण्याच्या नावाखाली नागरिकांच्या जीवाशी खेळ? या मथळ्याखाली प्रसिद्ध झालेल्या जनहिताच्या बातमीने शहरात मोठी खळबळ उडवून दिली होती. समाज माध्यमांवर ही बातमी मोठ्या प्रमाणात व्हायरल झाल्यानंतर नागरिकांकडून संतप्त प्रतिक्रिया उमटल्या. त्यानंतर शहरातील अनेक ठिकाणांवरील मोडक्या-तोडक्या व अस्वच्छ २० लिटर जार अचानक गायब झाल्याचे दिसून आले. त्यांच्या जागी नवीन जार वापरात आणण्यात आल्याचे चित्र असले तरी पाण्याच्या गुणवत्तेबाबतचा मूळ प्रश्न मात्र अद्याप कायम आहे.

यामुळे प्रशासनाची मूक संमती आहे की कुठली तडजोड झाली आहे, असा संशय नागरिकांमध्ये व्यक्त केला जात आहे. उन्हाळ्याच्या तीव्रतेमुळे शहर व ग्रामीण भागात जारच्या थंड पाण्याची मागणी मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. मात्र थंड म्हणून विकले जाणारे पाणी खरोखरच शुद्ध आहे का, हा प्रश्न आता अधिक गंभीर बनला आहे.अनेक ठिकाणी पाणी शुद्धीकरणाची प्रक्रिया योग्य पद्धतीने केली जाते का, याबाबत शंका उपस्थित होत आहेत. काही विक्रेते केवळ साधे फिल्टर करून किंवा जुन्या जारमध्ये पाणी भरून विक्री करत असल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.आरोग्य तज्ज्ञांच्या मते, दूषित किंवा अपूर्णपणे शुद्ध केलेले पाणी पिण्यामुळे जुलाब, पोटाचे विकार, टायफॉईड, पिवळ्या काविळीसारखे गंभीर आजार होण्याचा धोका वाढतो. विशेषतः



उन्हाळ्यात अशा आजारांचा फैलाव वेगाने होऊ शकतो. या पार्श्वभूमीवर सामाजिक कार्यकर्ते विजय भगत यांनी काही ठिकाणी पाणी शुद्धीकरणाच्या नावाखाली संशयास्पद रासायनिक द्रव्यांचा वापर होत असल्याचा गंभीर आरोप केला आहे. प्रत्यक्षात पाण्याची शुद्धीकरण प्रक्रिया ही वैज्ञानिक पद्धतीने फिल्ट्रेशन, डिसइन्फेक्शन, यूव्ही किंवा आरओ प्रणालीद्वारे होणे आवश्यक असते. मात्र शॉर्टकट म्हणून रासायनिक पदार्थांचा वापर झाल्यास त्याचे थेट दुष्परिणाम मानवी शरीरावर होऊ शकतात, असा इशारा तज्ज्ञांनी दिला आहे.गेल्या काही दिवसांत शहरातील विविध भागांत पाण्याची चव बदलणे, दुर्गंधी येणे, तसेच पाण्याचा रंग किंचित बदलल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. अनेक नागरिकांनी विक्रेत्यांकडे तक्रारी केल्या असल्या तरी त्यावर कोणतीही ठोस कारवाई झालेली नसल्याने नाराजी वाढत आहे.नागरिकांनी प्रशासनाकडे जार पाणी विक्रेत्यांची नियमित तपासणी मोहीम राबवून पाण्याचे नमुने तपासावेत, तसेच निकृष्ट व दूषित पाणी विकणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी केली आहे. उन्हाळ्यात शरीराला पाण्याची गरज असली तरी ते सुरक्षित आणि शुद्ध असणे अधिक महत्त्वाचे असल्याने थंड आहे एवढ्यावर न थांबता शुद्ध आहे का? हे तपासणे आता काळाची गरज बनली आहे.

# पंचशील प्रतिष्ठानच्यावतीने ५ जून रोजी सामूहिक मंगल परिणय मेळावा

नांदेड/प्रतिनिधी-पंचशील प्रतिष्ठान नांदेडच्या वतीने दि.५ जून रोजी चौथा मंगल परिणय सोहळा चांदोजी पावडे मंगल कार्यालय येथे आयोजित करण्यात आला आहे. या मेळाव्याची जय्यत तयारी सुरु असून आतापर्यंत सतरा जोडप्यांची नोंदणी झाली आहे. अशी माहिती मेळाव्याचे मुख्य संयोजक भरतकुमार कानिंदे यांनी दिली आहे.

पंचशील प्रतिष्ठान नांदेडच्यावतीने गेल्या चार वर्षांपासून सामूहिक मंगल परिणय मेळावा आयोजित केला जातो. हुंडा व अनावश्यक खर्च टाळून आतापर्यंत अनेक जोडपे मंगल परिणय मेळाव्यात विवाहबद्ध झाले आहेत. समाजातील गोरगरीब,कष्टकरी, सर्वसामान्य जनतेचा विवाहासाठी होणारा अनाठायी खर्च वाचावा, तोच पैसा समाजाने आपल्या परिवाराचे जीवनमान उंचावण्यासाठी खर्च करावा आणि सर्व समाज बांधवांनी आपुलकीने एकत्र येऊन कमीत कमी खर्चामध्ये आपल्या मुला-मुलींचे विवाह पार पाडावेत या माध्यमातून समाजामध्ये एकी, आपुलकी, प्रेम, सहानुभूती वाढावी या उदात्त हेतूने नांदेड शहरातील पंचशील प्रतिष्ठान च्या वतीने सामूहिक बौद्ध विवाह मेळावा आयोजित करण्यात येतो यावर्षीचा हा चौथा सामूहिक बौद्ध विवाह मेळावा असून हा विवाह मेळावा शुक्रवार ५ जून रोजी चांदोजी पावडे मंगल कार्यालय येथे दुपारी १२.३५ वाजता संपन्न होणार आहे. या विवाह मिळाल्याबद्दल पालकांनी आपल्या मुला मुलींचे विवाह पार पडावा यासाठी जिल्हा भरामध्ये पॉम्पलेट, स्टिकर्स, भित्तीपत्रे लावून या सामूहिक विवाह मेळाव्याचा प्रचार - प्रसार नांदेड जिल्ह्यात गेल्या दोन महिन्यापासून सुरु आहे. यास समाजातील विवाह इच्छुक वधू-वर तसेच पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. या मेळाव्यासाठी स्वागत समिती, महिला समिती, भोजन समिती, दक्षता समिती आदी समित्या स्थापन करण्यात आले असून या समितीच्या मार्फत मेळाव्याची जय्यत तयारी सुरू आहे. आतापर्यंत या सामूहिक विवाह मेळाव्यासाठी १७ जोडप्यांची नोंदणी झाली आहे. मंगल परिणय सोहळ्यास मोठ्या संख्येने नागरिकांनी उपस्थित रहावे, असे आवाहन संयोजन समितीच्यावतीने अध्यक्ष इंजिनीयर अशोकराव येरेकर, भरतकुमार कनिंदे, भीमराव धनजकर, सचिव इंजिनीयर आर. बी.मादळे, भगवानराव धबडगे, यशवंतराव उबारे, गौतमराव कांबळे, प्रशांत ठमके, प्रेमदास घुले, कोंडीबा वासाटे, डॉ.करुणा जमदाडे, मनोरमाबाई कावळे, अनिताताई हिंगोले, विमलताई कीर्तन, अंजली मुनेश्वर, पद्मिनीताई इंगोले, ज्योती कदम, रमाताई पाटील, कुसुम धोटे, सुनिता कानींदे, जयश्री भगत, नंदा नांगरे, निर्मलाताई नरवाडे, वैशाली सोनसळे, पुष्पा भरणे, वैजंता वाघमारे, मंगला वाघमारे, प्रतिमा भगत यांनी केले आहे.

# प्रा.अभय जोशी यांना आचार्य पदवी

उमरखेड/प्रतिनिधी-येथील गोपिकाबाई सीताराम गावंडे महाविद्यालयातील प्रा.अभय सुभाष जोशी यांना नुकतीच संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाने मराठी विषयात आचार्य (पीएच.डी.) पदवी जाहीर केली आहे. आशा बगे यांच्या कथात्म वाङ्मयाचा चिकित्सक अभ्यास हा त्यांच्या संशोधनाचा विषय होता.




संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या मराठी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या अकॅडेमिक काउन्सिलचे सदस्य आणि अचलपूर कँप; परतवाडा येथील स्व.छगनलाल मूलजीभाई कढी कला व विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. काशिनाथ बऱ्हाटे यांच्या मार्गदर्शनात त्यांनी हे संशोधन कार्य पूर्ण केले. प्रा.अभय जोशी यांचे 'कातरवेळी', 'बाकी उरते शून्य' हे कथासंग्रह, 'सांजसावल्यांच्या प्रदेशात' ललितलेख संग्रह, 'मारव्यात डोकावताना' व 'मराठी कादंबरी : प्रवाह व समीक्षा' हे समीक्षाग्रंथ ही पुस्तके प्रकाशित झाली असून त्यांना पद्मगंधा प्रतिष्ठान, नागपूरचा राज्यस्तरीय पुरस्कार व नाशिकच्या दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर पत्रकार संघाच्या राष्ट्रीय कर्मयोगी' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

पान १ वरुन

## कांदा उत्पादक...

खर्च आणि शेतमालाला मिळत नसलेला योग्य भाव यामुळे राज्यातील शेतकरी गंभीर आर्थिक संकटात सापडला आहे. विशेषतः कांदा उत्पादक शेतकरी मोठ्या अडचणीत असून बाजारात कांद्याचे दर घसरल्याने त्यांना उत्पादन खर्चही वसूल होतं नाही. सरकारने कांद्याच्या शासकीय खरेदीची घोषणा केली असली तरी प्रत्यक्षात अद्याप खरेदी प्रक्रिया सुरू झालेली नाही. शेतकरी संकटात असताना सरकारकडून अपेक्षित मदत मिळत नसल्याने ग्रामीण भागात मोठी नाराजी आहे. शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी काँग्रेस पक्ष आणि संपूर्ण महाविकास आघाडी त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभी आहे. कांदा उत्पादक शेतकऱ्यांना योग्य हमीभाव आणि दिलासा मिळेपर्यंत काँग्रेसचा संघर्ष सुरू राहील, असेही हर्षवर्धन सपकाळ यांनी स्पष्ट केले.




आ.बालाजी कल्याणकर यांच्या वाढदिवसानिमित्त सुप्रसिद्ध गायक राहुल देशपांडे यांचा संगीत संध्या कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाला नागरिकांनी मोठी गर्दी केली होती.

पान १ वरुन

## शेतकऱ्यांच्या कर्जमाफीवर...

येणार नाहीत. विधान परिषद निवडणूक संपल्यानंतर याबाबतची सविस्तर माहिती अधिकृतपणे जाहीर करण्यात येईल. वाढते उत्पादन खर्च, नैसर्गिक आपत्ती, अनियमित पाऊस आणि बाजारभावातील चढ-उतार यामुळे अनेक शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत. दरम्यान, या कर्जमाफीला मंत्रिमंडळाची मंजुरी मिळाल्याने शेतकरी वर्गात समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## ग्रामसडक योजना टप्पा-३ ला...

करण्यात आला.उच्च शिक्षण क्षेत्रातही महत्त्वाचा निर्णय घेत हैद्राबाद (सिंध) नॅशनल कॉलेजिएट विद्यापीठ, मुंबई या समूह विद्यापीठामध्ये सहा महाविद्यालयांचा समावेश करण्यास मंत्रिमंडळाने मंजुरी दिली. यामध्ये प्राचार्य के. एम. कुंदनानी औषध निर्माणशास्त्र महाविद्यालय, किशनचंद चेलाराम विधी महाविद्यालय, मिठीबाई मोतीराम कुंदनानी वाणिज्य व अर्थशास्त्र महाविद्यालय, ऋषी दयाराम आणि सेठ हसराम नॅशनल व सेठ वासियामुल्ल असोमुल्ल विज्ञान महाविद्यालय तसेच थडोमल शाहनी अभियांत्रिकी महाविद्यालयाचा समावेश करण्यात आला आहे.

## मुंबई पोलिसांच्या...

कोल्हापुरातही राज्य उत्पादन शुल्क विभागाने धाडी टाकत १०० ठिकाणी छापेमारी केली आहे. तर, मुंबईच्या साकीनाका पोलिसांनी ड्रग्स विरोधात मोठी कारवाई करत ८० कोटी रुपयांचे एमडी ड्रग्ज जप्त केले आहेत. याप्रकरणी, अधिक तपास सुरू आहे.मुंबईतील साकीनाका पोलिसांनी अमली पदार्थांविरोधातील मोठी कारवाई करत तब्बल ८० कोटी किमतीचे एमडी ड्रग्ज जप्त केले आहेत. या प्रकरणात अमली पदार्थांच्या अवैध तस्करीशी संबंधित काही आरोपींवर कारवाई करून त्यांना अटक करण्यात आली आहे.

# देहव्यापार प्रकरणातील फरार आरोपी नवी मुंबई येथून जेरबंद

## तीन दिवसांची पोलीस कोठडी

नायगाव/प्रतिनिधी-राज बारमध्ये सुरू असलेल्या देहव्यापार प्रकरणातील फरार आरोपी सोहेल शेख (रा. कोपर खैरणी, नवी मुंबई) याला रामतीर्थ पोलिसांनी अटक केली आहे. न्यायालयासमोर आरोपीला उभे केले असता आरोपीस तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

राज बारवर झालेल्या कारवाई दरम्यान सहा महिला देहव्यापार करत असल्याचे आढळून आले होते. या प्रकरणात देहव्यापारासाठी मुली पुरवल्याच्या आरोपाखाली सोहेल शेख याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्हा दाखल झाल्यानंतर तो फरार झाला होता. फरार आरोपीचा शोध घेण्यासाठी रामतीर्थ पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक शिवराज नरवाडे यांच्या नेतृत्वाखाली विशेष पथक तयार करण्यात आले होते. पोलीस उपनिरीक्षक शिवराज नरवाडे व पोलीस अंमलदार नागरगोजे यांनी सातत्याने पाठपुरावा करून आरोपीचा ठावठिकाणा शोधून त्याला कोपरखैरणी (नवी मुंबई) येथून ताब्यात घेतले. दि.१ जून रोजी आरोपीला रामतीर्थ येथे आणून न्यायालयासमोर हजर करण्यात आले. तपासासाठी पोलिसांनी कोठडीची मागणी केली असता न्यायालयाने तीन दिवसांची पोलीस कोठडी मंजूर केली असल्याची माहिती पोलीस उपनिरीक्षक शिवराज नरवाडे यांनी दिली. दरम्यान, राज बारमध्ये सुरू असलेल्या कथित देहव्यापाराच्या प्रकारामुळे परिसरात मोठी खळबळ उडाली होती. या प्रकरणातील इतर आरोपींचा शोध यापूर्वीच घेण्यात आला असून त्यांना न्यायालयातून जामीन मिळाला आहे. मात्र, सोहेल शेख हा फरार असल्याने पोलिसांकडून त्याचा शोध सुरू होता.

पान १ वरुन

## लाडकी बहीण योजनेतील...

कारवाई करण्यात येणार असून त्यांच्याकडून मिळालेली रक्कम वसूल केली जाईल.दरम्यान, योजनेच्या पडताळणीत अनेक अपात्र लाभार्थी समोर आल्याने राज्य सरकारने ८१ लाख जणांना अपात्र ठरवले आहे. तर १ कोटी ७० लाख पात्र महिलांना योजनेचा लाभ पूर्ववत सुरू राहणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले.

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग अँण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com, मो.९४२२१७४७७४